**नियमित दिवाणी दावा क्र. ४१/२०२३ मधील निशाणी क्र. ५७ वरील आदेश**
( शीला रोकडे वगैरे वि. भगवंतराव रोकडे वगैरे)

सदरचा अर्ज प्रतिवादी क्रमांक ४, ५ व ८ ते १३ यांच्या विरुध्द दिनांक २६.१०.२३ व १४.११.२०२३ रोजी झालेला दावा एकतर्फा चालवण्यिाचा आदेश रद्द होवुन मिळण्याबाबत दाखल केलेला आहे.

०२. अर्ज व म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादीच्या विद्वान विधिज्ञाचा युक्तिवाद ऐकला.

०३. प्रकरणाचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तुत दावा जाहीर ठरावासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्रमांक ४, ५ व ८ ते १३ यांना दावा समन्सची बजावणी होउन ते प्रकरणात हजर झाले नाहीत. त्यामुळे सदर प्रतिवादी विरुध्द दावा एकतर्फा चालविण्याचा आदेश झालेला आहे. प्रतिवादी यांनी ते कामानिमित्त बाहेरगांवी असल्यामुळे व आजारी असल्यामुळे ते दाव्यामध्ये हजर होवु शकले नाही व व त्यांचे विरुध्द दावा एकतर्फा चालविण्याचे आदेश झाला आहे असे कथन केले आहे. सदर प्रतिवादी यांचे अर्जामध्ये नमुद केलेले कारण संयुक्ति वाटते. परंतु प्रतिवादी प्रस्तुत अर्ज आदेश झाल्याच्या दोन वर्षानंतर दाखल केला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्रमांक ४, ५ व ८ ते १३ विरुध्द एकतर्फा झालेला आदेश खर्चासह रदद होणे न्यायोचित होणार आहे. करिता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

**आदेश**

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्रमांक ४, ५ व ८ ते १३ विरुध्द दाव्यामध्ये दिनांक २६.१०.२३ व १४.११.२०२३ रोजी झालेला एकतर्फा आदेश वादीला रक्कम रुपये ५००/— दिल्यानंतर रद्द करण्यात येते.

NANAWARE MOHINI DATTATRAY
Digitally signed by NANAWARE MOHINI DATTATRAY
Date: 2025.06.23 12:45:21 +0530

स्थळ:— इगतपुरी
दिनांक:— २०/०६/२०२५

( मो. द. ननवरे )
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
इगतपुरी.